# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक: 15.04.2024** **वार: सोमवार**

---

**प्रचार-सहभाग**

लोकसभा निवडणुकीच्या कामासाठी नियुक्त झालेल्या सरकारी कर्मचारी, अधिकारी, तसंच शालेय शिक्षक, महाविद्यालयीन प्राध्यापक आणि इतर कर्मचाऱ्यांनी कोणत्याही राजकीय पक्षाच्या प्रचार मोहिमेत सहभागी न होण्याचे स्पष्ट आदेश पुण्याचे जिल्हा निवडणूक अधिकारी डॉक्टर सुहास दिवसे यांनी जारी केले आहेत. लोकप्रतिनिधी कायद्यानुसार निवडणूक कामासाठी नियुक्त झालेले कर्मचारी थेट निवडणूक आयोगाच्या कार्यकक्षेत येत असून, त्यांना कोणत्याही राजकीय कार्यक्रमामध्ये पक्षाचे सक्रिय सभासद म्हणून काम करता येत नाही. ही तरतूद लक्षात घेऊन नियुक्त झालेला कोणताही कर्मचारी प्रचार कार्यात आढळून आल्यास त्याच्याविरुद्ध थेट कारवाई करण्यात येईल, असा इशारा जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी दिला आहे.

**आंबेगाव**

शिरुर लोकसभा मतदारसंघा अंतर्गत आंबेगाव विधानसभा मतदारसंघातल्या मतदान केंद्रांवर दोन हजार 273 अधिकारी कर्मचारी नियुक्त आहेत. त्यांना मतदान प्रक्रिया, ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट यांच्या हाताळणीबाबत अवसरी इथं नुकतंच प्रशिक्षण देण्यात आलं.

या अधिकारी, कर्मचाऱ्यांना मतदानाच्या आदल्या दिवशी आणि मतदानाच्या दिवशीचं कर्तव्य आणि अधिकार याबाबत माहिती देण्यात आली. तसंच प्रशिक्षणासाठी नियुक्त करण्यात आलेल्या समन्वय अधिकाऱ्यांनी मतदान यंत्राबाबत माहिती दिली.

**उमेदवारी**

पुणे लोकसभेसाठी अपनी प्रजाहित पार्टीच्या वतीनं हेमंत पाटील यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. पुण्याबरोबरच बारामती, सातारा, माढा, कोल्हापूर, मुंबई आदी ठिकाणी आमचे उमेदवार असतील, असं पार्टीचे राष्ट्रीय महासचिव गजानन शिरसाट यांनी सांगितलं.

**सुप्रिया**

लोकसभा निवडणुकीच्या बारामतीच्या उमेदवार सुप्रिया सुळे यांनी आज भोर तालुक्याचा दौरा करून मतदारांशी संवाद साधला.

**मतदार जागृती**

मतदानाचा हक्क बजावा यासाठी दापोडीतल्या विनियार्ड वर्कर्स चर्च यांच्या वतीनं प्रार्थनेसाठी जमलेल्या 12 हजार नागरिकांना मतदान करण्याची शपथ देण्यात आली.

**आधार**

आधार कार्डाचं नूतनीकरण आणि नवीन आधार कार्ड मिळवण्यासाठी टपाल खात्याच्या पुणे ग्रामीण विभागामार्फत विशेष शिबिरांचं आयोजन करण्यात आलं आहे. ही शिबिरं ग्रामीण भागात घेण्यात येत असून ती 2 मे पर्यन्त सुरू राहणार आहेत.

भोर, वेल्हे, मुळशी, मावळ, खेड, आंबेगाव, जुन्नर, हवेली, शिरूर तालुक्यातल्या टपाल कार्यालयामार्फत ग्रामपंचायत, स्थानिक स्वराज्य संस्था, नगरपालिका, शाळा, गृहनिर्माण सोसायट्या इत्यादी ठिकाणी ही शिबिरं घेण्यात येत आहे. या शिबिरात आधार कार्डला मोबाईल क्रमांक जोडणे, नावात बदल करणे, घरचा पत्ता बदलणे, लहान मुलांचे आधार कार्ड तयार करणे आदी सुविधा पुरविण्यात येत आहेत.

**<u>यशस्वी</u>**

यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट

सायन्स या संस्थेमार्फत महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. या नेत्यांच्या जीवनचरित्रातून आपण प्रेरणा घेऊन आपापल्या परीनं समाजकार्यासाठी योगदान द्यायला हवं असं मत संस्थेचे संचालक डॉ. शिवाजी मुंढे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केलं.

**<u>पाणी</u>**

धरणातल्या अत्यल्प पाणी साठ्यामुळं पुणे शहरात अनेक ठिकाणी अपुरा पाणी पुरवठा होत आहे. मात्र बंगल्यांचं आवार धुणे, गाड्या धुणे अश्या कारणांनी पुणेकर पाण्याचा गैरवापरही मोठ्या प्रमाणावर करत आहेत. महापालिकेनं निर्जंतुक करून पुरवलेल्या पाण्याचा असा अपव्यव करण्यास बंदी असून जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी नुकतीच महापालिका आणि जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन उपलब्ध पाण्याचा जपून वापर करण्याबद्दलच्या उपाय योजनांचा आढावा घेतला.

**<u>क्राइम</u>**

शेअर बाजारातल्या गुंतवणूकीतून चांगला परतावा देण्याचे आमिष दाखवून 17 लाख 42 हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याबद्दल चंदननगर पोलिसांनी एका व्यक्तीविरूद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

तसंच धार्मिक तोडगा करण्याचं आमिष दाखवून एका डॉक्टरची 5 कोटी रुपयांची फसवणूक करण्यात आल्याबद्दल पोलिसांनी पाच जणांवर गुन्हा दाखल केला.

**<u>क्रीडा</u>**

पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेच्या मान्यतेनं एआय एक्सचेंज करंडक' 13 वर्षाखालील मुलांच्या आंतरक्लब 25 षटकांच्या क्रिकेट स्पर्धा सुरू आहेत. या स्पर्धेत दर्श मांगल याच्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर ट्रिनिटी स्पोटर्स अॅकॅडमीनं एके स्पोटर्स अॅकॅडमीचा 89 धावांनी पराभव केला. तर समर क्रिकेट नेक्स्ट अॅकॅडमीनं समर बिरे याच्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर अरेना 55 अॅकॅडमीचा 10 गडी राखून पराभव केला.

पुणे आणि परिसरात तापमानांचा पारा चढा असून कमाल तापमान 40 ते 41 अंशांच्या दरम्यान आहे. दुपारनंतर होणाऱ्या ढगाळ हवामानामुळे वातावरणातला उष्मा वाढत आहे. नागरिकांनी काळजी घेण्याचं आणि दुपारी कारणाशिवाय बाहेर न पडण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**